ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ — पुणें, बुधवार तारीख ३ डिसेंबर, १९५८ — अंक ४४


## विविध माहिती

**सीलोनमधील रबराचे मळे**—सीलोनमधील रबराच्या मळ्यांची पुनर्घटना करण्यासाठी रशिआनें आर्थिक व तांत्रिक मदत पुन्हा एकदां देऊं केली आहे. ह्या पूर्वींहि आर्थिक दृष्ट्या आतबट्ट्याच्या मळ्यांची सुधारणा करण्यासाठी रशिआनें दीर्घ मुदतीचें कर्ज देऊं केलें होतें. पण, प्रथम कर्जाची सर्व रकम रशिआ देणगी म्हणून देणार होता.

**रतलाम–गोधा दुहेरी मार्ग**—पश्चिम रेल्वेवरील रतलाम गोधा रेल्वेचा मार्ग दुहेरी करण्याचें काम सध्यां चालूं आहे. हा मार्ग ११७ मैल लांबींचा असून तो १९५९ अखेर पुरा होऊन वहातुकीसाठी खुला होईल, असा अंदाज आहे. मार्ग दुहेरी झाल्यावर त्याचे वहातुकीचें सामर्थ्य १०० टक्क्यांनीं वाढेल. ह्या कामासाठी सुमारें ९ कोटी रुपये खर्च येणार आहे.

**टीकच्या झाडांची लागवड**—निलगिरी पर्वताच्या पायथ्याशीं ४,८०० एकर जमिनींत टीकच्या झाडांची लागवड करण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे. लागवडीसाठी लागणाऱ्या पाण्याची सोय मुद्दाम करण्यांत आली आहे. राज्यांची पुनर्रचना झाल्यावर मद्रास राज्यांतील टीकच्या झाडांचा प्रदेश केरळ राज्यांत गेला. त्यावर उपाय म्हणून हा उपक्रम करण्यांत येत आहे.

**पश्चिम जर्मनींत चमत्कारिक रोग**— पश्चिम जर्मनींत अलीकडे एक प्रकारचा चमत्कारिक त्वचेचा रोग उद्भवला असून त्याची साथ सर्व देशभर पसरत चालली आहे. ह्या रोगानें हात व पाय ह्यावर परिणाम होतो आणि कधीं कधीं रोग्याला तापहि येतो. बॉन ह्या राजधानीच्या शहरांतच ५०० रोगी असल्याची नोंद झाली आहे. रोगाच्या प्रसारामुळें कांहीं ठिकाणच्या शाळा बंद करण्यांत आल्या आहेत.

**इस्कंदर मिर्झांची हालचाल**— पाकिस्तानचे पदच्युत अध्यक्ष मेजर जनरल इस्कंदर मिर्झा ह्यांनीं ब्रिटनमधील लॉइडस् बँकेंत व कांहीं स्विस बँकांतून बरेच पैसे ठेवले असल्याचें समजतें. पाकिस्तानमधील आपली मालमत्ता कायदेशीर रीतीनें मिळविण्याच्या प्रयत्नांतहि ते आहेत. ब्रिटनमध्यें कांहीं धंदा करण्याचा त्यांचा विचार आहे. सध्यां ते तीन खोल्यांच्या एका बिऱ्हाडांत राहत आहेत.

**शास्त्रीय परिभाषा व संस्कृत**--भारतीय भाषांतून जरूर ती शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा तयार करण्याच्या कामीं संस्कृतचा चांगला उपयोग होईल; त्याचप्रमाणें इतर परकीय भाषांतील शब्द जसेच्या तसे वापरतां येतील, असें मत केरळचे मुख्यमंत्री श्री. नंबुद्रीपाद ह्यांनीं व्यक्त केलें आहे.

**कापराच्या आयातीचा परवाना**—भारतामधील कापराचा सांठा कांहीं व्यापाऱ्यांनीं खरेदी करून त्याची कृत्रिम टंचाई निर्माण केल्याच्या तक्रारी करण्यांत येत होत्या. त्याबद्दल मध्यवर्ती सरकारची खात्री झाल्यानें कापराची बरीच मोठी आयात करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. आयात करण्यासाठी स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनला परवाना देण्यांत आला आहे.

**निवडणुकीसाठी बेफाट खर्च**—अमेरिकेंतील न्यूयॉर्क संस्थानाच्या गव्हर्नराच्या पदावर निवडून आलेले उद्योगपति मि. नेल्सन रॉकफेलर ह्यांनीं निवडणुकीसाठी ७० लाख रुपये खर्च केले. ब्रिटनच्या सार्वत्रिक निवडणुकींत कांहीं पक्षांनीं खर्च केलेल्या रकमेइतकी ही रक्कम आहे. ते एक महिनाभर रोज टेलिव्हिजनवर प्रचार करीत असत व दर वेळीं २·७ लाख रुपये खर्च करीत. मि. रॉकफेलर व त्यांचे प्रतिस्पर्धी डेमॉक्रॅटिक उमेद्वार मि. हॅरीमन ह्या दोघांनींहि आपण सामान्य अमेरिकन नागरिक आहों हें दाखविण्यासाठी साधें जेवण घेत असल्याबद्दलची प्रसिद्धि करून घेतली.

**वीज-बोर्डाचें कर्ज**—केरळ राज्याच्या वीज बोर्डानें १५० लाख रुपयांचें कर्ज उभारण्याचा निर्णय घेतला आहे. १०० रुपये दर्शनी किंमतीचे व दहा वर्षें मुदतीचे बॉंडस बोर्ड काढणार आहे. रोख्यांची विक्रीची किंमत ९९ रुपये असेल व त्यावर ४॥ टक्के व्याज देण्यांत येईल. कर्ज डिसेंबरच्या १० तारखेला खुलें होईल व २० तारखेला बंद करण्यांत येईल.

**विद्यार्थ्यांच्या आत्मघाताचीं कारणें**—जानेवारी, १९५६ ते मार्च, १९५८ ह्या काळांत उत्तर प्रदेशांत २५ विद्यार्थ्यांनीं आत्मघात करून घेतला होता. आत्मघाताच्या कारणांची चौकशी करतां, परीक्षांतील अपयश, प्रेम प्रकरणें आणि घरांतील कटकटी, हीं कारणें प्रामुख्यानें दिसून आलीं. ह्याच काळांत १० विद्यार्थी घरांतून नाहींसे झाले होते.


दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### घड्याळांच्या उत्पादनासाठी स्विट्झरलंडचें साह्य

भारतांत घड्याळांचें उत्पादन करण्यासाठीं स्विट्झरलंडचें साह्य घेण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ह्या प्रश्नाविषयीं सल्लामसलत देण्यासाठीं सरकारनें स्विट्झरलंडमधील कारखानदारांचें एक प्रतिनिधिमंडळ बोलावलें होतें. प्रतिनिधिमंडळानें ह्या बाबतींत सहकार्य देण्याचें आश्वासन दिलें आहे. घड्याळाच्या उत्पादनांतील कसब भारतामधील कामगारांना शिकविण्यासाठीं स्विस सरकारनें दरसाल २० हिंदी कामगारांना शिष्यवृत्त्या देऊं केल्या आहेत. ह्या कामगारांनीं स्विट्झरलंडमध्यें २॥ वर्षें राहून घड्याळांच्या उत्पादनांतील बारकावे शिकून घ्यावयाचे आहेत. स्विस कारखानदार अशा प्रकारच्या शिष्यवृत्त्या जगांतील सर्व देशांच्या विद्यार्थ्यांसाठीं देणार असून हा उपक्रम बरींच वर्षें चालणार आहे. सर्व शिष्यवृत्त्यांचा खर्च स्विस कारखानदार करणार आहेत. ह्या मदतींशिवाय भारतांत घड्याळांच्या निर्मितीचें शिक्षण देणारी एक संस्थाहि स्थापन करण्यांत येणार आहे. संस्थेंत दरसाल २०० विद्यार्थ्यांना शिकवून तयार करण्यांत येईल. त्यांचाहि शिक्षणक्रम २॥ वर्षांचाच असेल. संस्थेसाठीं लागणारी यंत्रसामुग्री स्विस कारखानदार पुरविणार आहेत आणि तिचा वापर शिकविण्यासाठीं आपले तज्ज्ञहि धाडणार आहेत. भारताला सध्यां परदेशीय चलनाची अडचण असल्यामुळें घड्याळांच्या आयातीला बंदी करण्यांत आलेली आहे. त्याचबरोबर घड्याळांचे कारखाने देशांतच काढण्याविषयींहि सरकारचा विचार चालू आहे, ह्याविषयीं कांहीं योजना बऱ्याच प्रगत झाल्याचेंहि समजतें. घड्याळांशिवाय इतर प्रकारची यंत्रसामुग्रीहि भारताला स्विट्झरलंडकडून मिळण्यासारखी आहे. त्यामुळें उभयतांचे औद्योगिक संबंध निकटचे झालेले आहेत.

---

### चीनचें पोलादाचें वाढतें उत्पादन

कोणत्याहि आधुनिक राष्ट्राची औद्योगिक प्रगति व लष्करी सामर्थ्य तेथील पोलादाच्या धंद्यावर मुख्यतः अवलंबून असतात. म्हणून आशिआंतील नव्यानें स्वतंत्र झालेलीं सर्वच राष्ट्रें आपआपल्या परीनें पोलादाचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न करीत आहेत. भारताचे पोलादाचे तीन मोठे कारखाने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस उत्पादन करूं लागतील अशी आशा सरकारतर्फे व्यक्त करण्यांत येत आहे. पोलादाची निर्मिति करणारे प्रचंड कारखाने उभारण्यास अपरंपार भांडवल लागतें. अशा कारखान्यांतून मोठ्या प्रमाणावर उत्पादन करतां येत असलें तरी भांडवलाच्या अभावीं सर्वच पोलादाचे कारखाने जगड्व्याळ स्वरूपाचे उभारणें शक्य नसतें. चीननेंहि भारताप्रमाणेंच कांहीं मोठे कारखाने उभारले आहेत. पण, त्याचबरोबर स्थानिक साधनसामुग्री व मनुष्यबळ ह्यांचा उपयोग करून छोट्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या पोलादाच्या भट्ट्याहि चालू केल्या आहेत. अशा प्रकारच्या ग्रामोद्योगी स्वरूपाच्या भट्ट्यांतून रोज ९१,००० टन पोलाद निर्माण करण्यांत येत आहे. सुमारें १० लाख भट्ट्या व ३॥ कोटींवर लोक ह्या कामांत गुंतलेले आहेत. उत्पन्न झालेल्या पोलादाचा उपयोग तेथल्या तेथेंच करणें पुष्कळदां अशक्य असल्यानें हें सर्व पोलाद मोठ्या कारखान्यांकडे पोंचविलें जातें. पोलादासारखी वस्तु मोठ्या कारखान्यांतूनच उत्पादन करणें सोयीचें असेल अशी समजूत औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांच्या अनुभवावरून होणें साहजिक आहे. परंतु ह्याहि बाबतींत दुसरे मार्ग असूं शकतात, असें चीनच्या उदाहरणावरून दिसतें.

### श्री वीरशैव को. बँक लि., कोल्हापूर

अध्यक्ष : श्री. एम्. बी. चौगुले.
मॅनेजर : श्री. एम् जी. जोटकर, बी. ए. (ऑनर्स)

वरील बँकेच्या पटावर ९८५ सभासद आहेत, व त्यांनीं १,२५,००० रु. चें शेअर भांडवल घेतलेलें आहे. त्यांपैकीं ६२,५०० रु. वसूल झालेलें आहे. बँकेकडे रिझर्व्ह फंड, बिल्डिंग फंड, इत्यादींत मिळून ५७,०९१ रु. आहेत. गेल्या सालीं ५,३६,२२२ रु. च्या ठेवी होत्या, त्यांत अहवालाचे वर्षी २८,५३६ रु. ची वाढ होऊन जून, १९५८ अखेर एकूण ठेवी ५,६४,७५८ रु. च्या झाल्या आहेत. एकूण येणें कर्ज ४,०१,८२९ रु. आहे. त्यांपैकीं १,८३,५९२ रु. चें कर्ज तारणावरील आहे. सरकारी धोरणानुसार, सर्व जमातींतील लोकांना लहान मुदतीचीं तारण कर्जें देण्याचें बोर्डानें धोरण ठरवून त्याचा प्रत्यक्षांत अंमल सुरू केला आहे. सहकारी कारखान्याचे शेअर्स खरेदी करून बँकेनें सरकारी धोरणानुसार आपल्या ताकदीप्रमाणें सहकारी चळवळीच्या वाढीस मदत केली आहे. निव्वळ नफा १८,८६९ रु. झाला. ६% डिव्हिडंड देण्यांत आलें.

---

### दि इस्लामपूर को-ऑ. पीपल्स बँक लि.

(चेअरमनः–श्री. एम. डी. पवार.
मॅनेजरः–श्री. डी. डी. लाटकर)

वर्षअखेर एकूण ठेवी १,४३,४०३ रु. च्या आहेत, आणि कर्जें १,१३,५८३ रु. चीं येणें आहेत. शेअर भांडवल ३६,२२५ रु असून रिझर्व्ह फंड १९,०४५ रु. चा आहे. इतर फंडांत १०,६८८ रु. आहेत. म्हणजे, बँकेचें स्वतःचें भांडवल ६७ हजार रुपयांचें आहे. व्याज जमा, चेकहुंडी कमिशन, नफा, इत्यादींच्या रकमेंत सालोसाल वाढ होत आहे. अहवालाचे वर्षी थकबाकी–कर्जदारांनीं वेळेवर कर्जांची फेड केली असती, तर नफ्याचा आंकडा ८,०३० रु. ऐवजीं १२,००० रु. वर गेला असता. उरण इस्लामपूर येथील सर्व प्रकारच्या लोकांशीं व संस्थांशीं सहकार्य करून ही संस्था गेलीं बत्तीस वर्षें कामें करीत आहे.

### दि इस्लामपूर अर्बन को. बँक लि.

(चेअरमनः–श्री. गो. ल. फडणीस, बी. ए., एलएल. बी.,
सेक्रेटरीः–श्री. के. डी. बोरकर)

अहवालाचे वर्षीं सभासदांची संख्या २५८ होती. ठेवींची रकम २०,८८१ रु. नीं वाढून ती १,५०,९२४ रु. झाली. खेळतें भांडवलहि १,९७,२६६ रु. वरून २,१६,२२४ रु. वर गेलें आहे एकूण कर्ज येणें १,२९,९९१ रु. आहे. अहवालाच्या वर्षीं सुरू केलेल्या सोनें गहाण कर्जांत १०,१९९ रु. गुंतले आहेत. हुंडी केडिटचाहि नवा व्यवहार फायदेशीर होत आहे. निव्वळ नफा ३,०६२ रु. झाला. ३% डिव्हिडंडला ७८६ रु. लागले. बँकेचें शेअर भांडवल २६,२०५ रु. असून रिझर्व्ह फंड ८,२५१ रु. चा आहे आणि इतर फंडांत ३,३७१ रु. आहेत. १९५९–६० मध्यें बँकेची रौप्य ज्युबिली येत आहे. त्याच्या समारंभाची तरतूद म्हणून नफा वांटणींतून १०० रु. बाजूला काढले आहेत.

---

### बँक ऑफ कोंकण—इमारत प्रवेश समारंभ

दि बँक ऑफ कोंकण लि. च्या मुख्य कचेरीच्या इमारतीचा प्रवेश समारंभ दि. १२–११–१९५८ रोजीं झाला. ही इमारत मालवण येथें भर बाजारपेठेंत टुमदार बांधण्यांत आली आहे. सकाळीं जागेची वास्तुशांति करण्यांत आली व रात्रीं पानसुपारी झाली.

# अर्थ

बुधवार, ता. ३ डिसेंबर, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पब्लिक सर्व्हिस कमिशनचा निराशाजनक वृत्तांत

युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशनचा १९५७-५८ चा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यांत परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या बेसुमार वाढत असल्याची नोंद करण्यांत आली आहे. उपलब्ध जागा त्या मानानें कितीतरी कमी आहेत. लेखी परीक्षेंतील उत्तरांसंबंधीं परीक्षकांचा अनुभव सांगतो, कीं उमेदवारांची लायकी कमी होत चालली आहे. कमिशननें वेगवेगळया सरकारी नोकऱ्यांसाठी मिळून १९ परीक्षा घेतल्या आणि संरक्षक खात्याच्या सहकार्यानें त्या खात्यांतील भरतीसाठी आठ परीक्षा घेण्यांत आल्या. ह्या सर्व परीक्षांस मिळून एकूण १,७०० जागांसाठी ५६,९५८ उमेदवार बसले होते. उमेदवारांची संख्या आंवाक्याबाहेर झाली, म्हणजे त्यांच्या बसण्याची सोय करणेंहि अवघड होतें; योग्य परीक्षक पुरेसे मिळत नाहींत आणि मार्क देण्याचे बाबतींत समपातळी राखणें कठीण जातें. 'जॉइंट सर्व्हिसेस विंग' परीक्षांना मात्र पुरेसे लायक उमेदवार बसत नाहींत; लेखी परीक्षांत उत्तीर्ण होणारांपैकीं बहुसंख्य उमेदवार संरक्षक खात्यामार्फत घेण्यांत येणाऱ्या चांचणींत नापास होतात आणि त्यांतून पुनः कितीतरी वैद्यकीय तपासणीच्या अटी पुऱ्या करूं शकत नाहींत. नाविक परीक्षांचे बाबतींत परिस्थिति अधिकच निराशजनक आहे. वयाचे खोटे दाखले देणाऱ्या व कॉपी करून उत्तीर्ण होऊं पहाणाऱ्या उमेदवारांची संख्या वाढत आहे!

---

## तांत्रिक शिक्षणाची ब्रिटनची योजना

आधुनिक यंत्रयुगाच्या सुरुवातीला ब्रिटनकडे असलेलें पुढारीपण आतां राहिलेलें नाहीं. एका बाजूला अमेरिका व दुसऱ्या बाजूला रशिआ, ह्या मोठ्या राष्ट्रांनीं आधुनिक शास्त्र आत्मसात करून ब्रिटिश वर्चस्वाला खो दिला. त्यामुळें ब्रिटनला आपल्या तांत्रिक शिक्षणाची योजनाबद्ध आखणी करणें प्राप्तच झालें आहे. तांत्रिक शिक्षणाच्या उच्च संस्था व कॉलेजें ह्यांची स्थापना करण्यासाठी ब्रिटननें २॥ वर्षापूर्वी एक योजना आंखली व तिच्या अंमलबजावणीस प्रारंभ केला. ह्या योजनेसाठी १० कोटी पौंड खर्च करण्यांत येणार आहेत. तांत्रिक शिक्षणाची योजनाबद्ध आखणी करण्यांत ब्रिटनचा हेतु आंतरराष्ट्रीय स्पर्धेंत केवळ टिकून राहण्याचा नाहीं. ब्रिटनला नुसतें जगावयाचें म्हटलें तरीसुद्धां तांत्रिक शिक्षणाची वाढ करणें आवश्यक झालें आहे. नवनव्या प्रकारची यंत्रसामुग्री तयार करून ती गरजू देशांना विकणें आणि तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करून इतर देशांपेक्षा स्वस्त असा माल जागतिक बाजारपेठेंत धाडणें, ह्यावर ब्रिटनचें जीवन अवलंबून आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर नवीन अस्तित्वांत आलेल्या उद्योगधंद्यांना कशा प्रकारची व किती तंत्रकुशल माणसें लागतील तें अजमावण्यासाठी बऱ्याच समित्या नेमण्यांत आल्या होत्या. त्या समित्यांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं, १९७० च्या सुमारास ब्रिटनला दरसाल २०,००० शास्त्रज्ञांची व एंजिनिअर्सची जरूरी लागणार आहे. हा हिशोब १९५६ सालीं करण्यांत आला होता. त्यावेळीं दरसाल १०,००० शास्त्रज्ञ, एंजिनिअर्स शिकून तयार होत असत. ह्यावरून ह्या प्रश्नाची निकड लक्षांत येते.

---

## लष्कराला लागणाऱ्या मोटारगाड्यांचें उत्पादन

आधुनिक लष्करांत गतिमानतेला फार महत्त्व आहे. लष्कराच्या हालचाली योग्य वेळीं वेगानें करावयाच्या असतील तर सैन्य वाहून नेणाऱ्या ट्रक्सची व वहातुकीच्या इतर साधनांची अतिशय आवश्यकता असते. भारताच्या लष्कराला दरसाल २,००० ते ४,००० मोटार ट्रॅक्सची आवश्यकता भासते. निरनिराळ्या कामासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या मोटारी व ट्रॅक्टर्स भारत सरकारचें संरक्षणखातें आयात करीत असतें. ह्या गरजेपैकी कांहीं भाग भारतामधील मोटार कारखान्यांकडून भागविला जातो. पण निरनिराळ्या कारखान्यांकडून घेण्यांत येणाऱ्या मोटारी एकाच साच्याच्या नसतात. त्यामुळें लष्करापुढें नवीनच प्रश्न उपस्थित होतात. शिवाय संरक्षण खात्याला मोटारींचे सुटे भाग बऱ्याच प्रमाणांत आयात करावे लागतात. ही उणीव लक्षांत घेऊन सरकारच्या संरक्षण खात्यानें दोन परदेशीय कंपन्यांशीं करार करून लष्करासाठी लागणाऱ्या मोटारगाड्या व ट्रॅक्टर्स देशांतच तयार करण्याचें ठरविलें आहे. लष्कराला लागणाऱ्या मोटारगाड्या तयार करण्यासाठी पश्चिम जर्मनींतील एका कारखान्याशीं करार करण्यांत आला आहे, व ट्रॅक्टर्स तयार करण्यासाठी एका जपानी कारखान्याचें सहकार्य घेण्यांत येणार आहे. मोटारगाड्यांचा कारखाना उभारण्यासाठी ७० लाख रुपये भांडवल लागणार आहे. त्यांपैकीं ४३ लाख रुपये किंमतीची यंत्रसामुग्री परदेशांतून आणावी लागणार आहे. ट्रॅक्टर्स तयार करणाऱ्या कारखान्यासाठी सुमारें १ कोटी रुपयांचें भांडवल लागेल. भारताच्या पूर्व व पश्चिम दिशांकडील कांहीं देशांत अलीकडे लष्करी स्वरूपाच्या क्रांत्या झाल्या आहेत. त्या लक्षांत घेतां वरील उपक्रम अतिशय निकडीचा मानावा लागेल.

---

## चंदिगड राजधानीचें बांधकाम मुदतींत पुरें करणार

चंदिगड राजधानीचें २४ कोटी रु. चें बांधकाम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांतच पुरें करण्याचें कॅपिटल प्रॉजेक्ट कंट्रोल बोर्डानें ठरविलें आहे. मार्च, १९६१ मध्यें राजधानीचें नियंत्रक बोर्ड रद्द करण्यांत येईल व उरलीं–सुरलीं कामें पब्लिक वर्क्स खात्यामार्फत करविलीं जातील. महत्त्वाचीं कामें लवकर हातीं घेऊन संपविण्यासाठी वेळापत्रक आखण्याकरितां बोर्डानें तिघांची एक कमिटी नेमली आहे. मोठ्या खर्चाच्या बाबींपैकीं राजभवनाची उभारणी स्थगित होणार आहे. आर्किटेक्टांची संख्या हळूहळू कमी करण्यांत येईल.

---

## बनावट सहकारी सोसायट्यांपासून सावध रहा

### सहकारी क्षेत्रांतील अनिष्ट प्रवृत्तींविषयीं पंजाबच्या सहकारी खात्याचे रजिस्ट्रार श्री. एस. एस. पुरी ह्यांचा इषारा

आपल्या सहकारी चळवळींत अनेक अनिष्ट गोष्टी शिरल्या आहेत. कांहीं सहकारी संस्थांत मतदानासाठी प्रॉक्झीची पद्धत स्वीकारण्यांत आली आहे, कांहीं सहकारी संस्थांनीं वाढाव्यानें उघड्या बाजारांत शेअर्स विकले आहेत, कांहींनीं जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या कारभाराच्या पद्धती स्वीकारल्या आहेत, कांहींनीं सावकारांनाच सभासद नोंदवून त्यांना कर्ज देण्यास प्रारंभ केला आहे. सहकारी चळवळीच्या उद्देशांना विसंगत अशा ह्या पद्धती आहेत.

कित्येक संस्था नांवानें सहकारी असल्या, तरी वस्तुतः त्या तशा नाहींत. सहकारी कायद्याखाली त्या नोंदलेल्या आहेत, म्हणूनच त्यांना सहकारी म्हणावयाचें. त्यांचे सभासद व कार्यपद्धति पाहिल्यावर त्यांना सहकारी म्हणणेंच चुकीचें ठरेल बहुधा, सहकारी बुरख्याखाली एकत्र आलेल्या दलालांची ती संघटना असते. अशा संस्था बिगर-सभासदांशींच मुख्यतः व्यवहार करतात; वास्तविक त्यांची लिमिटेड कंपन्या म्हणूनच नोंद व्हावयास हवी.

अशा बनावट सहकारी संस्थांची संख्या फार मोठी नाहीं; परंतु त्यांची संख्या व व्यवहारक्षेत्र ह्यांत वाढ होत आहे. ही प्रवृत्ति वेळींच रोखून धरली नाहीं, तर ती अनावर होईल आणि सहकाराचें फोलपट मात्र शिल्लक राहील. सहकारी संस्थांना इतर प्रकारच्या संस्थांपेक्षा किती तरी जास्त सवलती व आर्थिक फायदे मिळतात. इन्कम टॅक्स, स्टॅंप ड्यूटी, रजिस्ट्रेशन फी, ह्या बाबतींत सहकारी संस्थांना कितीतरी सवलती आहेत. राज्य सरकारांनीं सेल्स टॅक्स, प्रोफेशन टॅक्स इत्यादि बाबतींत सवलती दिलेल्या आहेत, त्या वेगळ्याच. ह्या सवलतींचा फायदा खऱ्या-खुऱ्या सहकारी संस्थांना मिळून त्यांची प्रगति होत आहे, हें कबूल. परंतु, त्यामुळें लबाड लोकांना सहकारी नांवाखाली जॉइंट स्टॉक कंपन्यांचे धंदे करण्यास प्रोत्साहन मिळतें, हेंहि खरें आहे. कर चौकशी कमिशननें ह्या प्रवृत्तीचा उल्लेख केलेला आहे, आणि कर चुकवणीस त्यामुळें वाव निर्माण होतो, असें म्हटलें आहे. सरकार लायसेन्स व कोटे देतांना सहकारी संस्थांना प्राधान्य देतें, हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. कांहीं बाबतींत तर सहकारी संस्थांसाठीच ते राखून ठेवलेले असतात. सहकारी बॅंकेकडून मोठें कर्ज मिळूं शकतें, हाहि आणखी फायदा आहे. तारणाचे बाबतींत सहकारी बॅंकेच्या अटी थोड्या सौम्य असतात. व्याजाचा दरहि माफक असतो.

"सहकारी संस्थांचे बाबतींत सबसिडी म्हणजे मृत्यूचें चुंबन होय" असें फोर्ड फौंडेशन टीमनें कांहीं वर्षांपूर्वी भारतास भेट दिली, त्यावेळीं म्हटलें होतें. सरकारी सबसिडीमुळें सहकारी संस्थेचें स्वावलंबन नष्ट होतें व त्याकारणानें तिचा पायाच उखडला जातो, असा त्या विधानाचा अर्थ आहे. खऱ्याखुऱ्या सहकारी संस्थांच्या बाबतींत हें विधान खोटेंहि ठरेल; सरकारी मदत योग्य प्रकारें दिली गेली, तर त्यामुळें सहकारी संस्थांचें पुनरुज्जीवन होण्यास मदत होईल व स्वतःच्या पायावर उभें रहाण्याची शक्ति त्या मिळवूं शकतील. तथापि, सहकारी संस्था काढण्याचा कित्येक उत्पादकांचा हेतु सुलभतेनें असे पैसे मिळविणें एवढाच मर्यादित असतो. अशा रीतीनें, सहकारी संस्थांचें रूपांतर सबसिडी मिळणाऱ्या यंत्रांत होत चाललें आहे.

गैरसोयीचे वाटणारे कित्येक कायदे सहकारी संघटनेमुळें चुकवितां येतात, ह्याहि उद्देशानें कित्येक प्रेरित होतात. विशेषतः जमीनविषयक कायद्यांनीं घातलेलीं बंधनें टाळणारांच्या बाबतींत हें विधान अधिक लागूं पडतें. सहकारी फार्मिंग सोसायटीच्या नांवाखाली हें साधतां येतें.

वरील सर्व हकीकतींवरून लक्षांत येईल, कीं सध्यां भारतांत दिसून येणाऱ्या सहकार्-प्रेमाचें मूळ कलंकित आहे. सहकारी पद्धति हें सरकारचें लादावलेलें मूल आहे, हें लोकांना कळून चुकलें आहे. सहकारी पद्धतीला 'अधिक नीतीची व सचोटीची' कीर्ति प्राप्त झालेली आहे, तिचा गैरफायदा घेण्यास लोक टपलेले आहेत; सहकारी झेंड्याचा दुरुपयोग होऊं लागला आहे.

सहकारी पद्धतीचा असा दुरुपयोग केला जाण्यास सहकारी कायदेच मदत करीत आहेत. सध्यांचा कायदा कडक व जाचक असून त्यामुळें सहकारी चळवळीच्या वाढीस अडथळा येत आहे, असें कित्येकांचें मत आहे. ह्यांत तथ्यांश असला, तरी तें सर्वस्वीं बरोबर नाहीं. भारतांतील सहकारी कायदा इतका लवचीक आहे कीं त्याच्या चौकटींत बिगर-सहकारी व्यवहारांना भरपूर वाव मिळत आहे; 'सहकारी सोसायटी'ची बिनचूक व्याख्या कोठेंहि आढळत नाहीं. सहकारी सोसायट्यांच्या कायद्याखाली कोणतीहि संस्था नोंदली गेली कीं ती सहकारी सोसायटी बनते. आकडे-शास्त्राच्या दृष्टीनें हें सोईचें असलें, तरी तें समाधानकारक नाहीं. सोसायटी नोंदण्याच्या बाबतींत कायद्यानें जीं नियंत्रणें घातलीं आहेत, तीं येथें महत्त्वाचीं आहेत. आपल्या सभासदांच्या सर्वसामान्य आर्थिक हितांचें संवर्धन सहकारी तत्त्वांनुसार करणाऱ्या संस्थांना सहकारी कायद्याखाली नोंदतां येतें. म्हणजे 'सहकारी तत्त्वें" ह्या शब्दांस महत्त्व प्राप्त होतें. त्यांपैकीं कांहीं तत्त्वें सहकारी कायद्यांतच ग्रथित केलेलीं आहेत; पण त्याविषयीं सरळ यादी दिलेली नाहीं. त्यामुळें, ह्या तत्त्वांचा शोध कायद्याच्या बाहेर जाऊन करावा लागतो. सहकारी विषयावरील पुस्तकांतून तीं तत्त्वें सांगितलेलीं असलीं, तरी तीं सहकारी अधिकाऱ्यांना पुरेसें मार्गदर्शन करू शकत नाहींत. तीं तत्त्वें वर्णनात्मक असतात; व्याख्यांच्या स्वरूपांत नसतात. त्याचा वेगवेगळा अर्थ लावतां येतो. वेगवेगळ्या पंडितांनीं केलेलें विवरण वेगवेगळें सांगतें.

कोणत्याहि दहा लोकांनीं एकत्र येऊन कोणत्याहि प्रकारची सोसायटी नोंदण्यासाठी अर्ज केला, कीं तो स्वीकारला जावा, असा सहकारी कायद्याचा आजचा प्रकार आहे. कधीं कधीं नामवंत बिगर-सरकारी सहकारी कार्यकर्तेंच मागणी करतात, कीं सहकारी खात्यानें अर्ज स्वीकारून सोसायट्या नोंदवाव्या; जास्त चौकशी करूं नये. सहकारी खात्यांतील विलंबास उत्तर म्हणून ही मागणी ठीक आहे. पण त्यांतील धोकाहि जबर आहे. ती मागणी मान्य केली गेली, तर बनावट सहकारी संस्था जिकडे तिकडे उदयाला येतील. सध्यां भारताच्या पुनर्रचनेचे कामीं सहकारी संघटनेस महत्त्वाचें स्थान आहे, असें सांगण्यांत येतें. पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनांतून सहकाराला विशेष स्थान देण्यांत आलेलें आहे. सहकारी संस्थांच्या महत्त्वाची जाणीव होण्यास त्याचा उपयोग करून देण्यासाठी तें ठीक आहे; पण खऱ्याखुऱ्या सहकारी संस्थांच्या बरोबरच बनावट सहकारी संस्थांना वाव मिळणार नाहींना, हें पाहिलें पाहिजे. ह्या बाबतींत पुरेशी दक्षता आरंभापासूनच घेतली गेली नाहीं, तर बनावट संस्थांच्या तणांतून खऱ्याखुऱ्या संस्था शोधून काढण्याची पाळी येईल!

## श्री. गरवारे, मुंबईचे नवीन शेरीफ

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष श्री. भा. दि. उर्फ आबासाहेब गरवारे यांची मुंबई सरकारनें शेरीफ म्हणून नियुक्ति केली आहे श्री. गरवारे यांनीं ३० वर्षांपूर्वी व्यापारी जीवनास सुरवात केली. मोटार व्यवसायांत त्यांनीं प्रवेश केला व थोड्याच अवधींत जागुआर, रायलीज, रोव्हर्स इ. ब्रिटिश मोटारींचे ते प्रतिनिधी बनले. गरवारे मोटर्स या त्यांच्या कंपनीनें अनेक परदेशी मोटारींची ओळख भारताला करून दिली.

गेल्या अनेक वर्षांपासून दरवर्षी परदेशांत ते व्यापारी परीक्षणाकरितां जात असतात व आज जगांतील बहुतेक देश त्यांनीं पाहिले आहेत. जगांतील व्यापारी व औद्योगिक प्रगतीचें निरीक्षण करून भारताला त्याचा उपयोग कसा करून घेतां येईल असा विचार ते करीत असतात. युद्धोत्तर काळांत परदेशांत प्लास्टिक उद्योगांची प्रगति पाहून त्यांनीं देशांत प्लास्टिक धंद्यांची सुरुवात केली व आज दक्षिण-पूर्व आशिआंतील एका प्रमुख प्लास्टिक उद्योगांत त्यांच्या कारखान्याचा समावेश होतो. प्लास्टिक धंद्यांत अद्यावत् प्रगति त्यांनीं केली आहे. व आज अनेक खाजगी व सरकारी उद्योगांना प्लास्टिकच्या वस्तूंचा पुरवठा ते करतात; एवढेंच नव्हे तर सिलोन, लेबानॉन, सिरिया, इजिप्त, आदि परदेशांतील सरकारचीहि मागणी पुरवितात.

ते भारतीय प्लास्टिक कारखानदार संघाचे १९५०-५१ व १९५६-५७ मध्यें अध्यक्ष होते. १९५४ सालापासून ते महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष आहेत व महाराष्ट्र आर्थिक विकास समितीचेहि कार्याध्यक्ष आहेत. अनेक व्यापारी व औद्योगिक संघटनांशीं त्यांचा संबंध आहे. सरकारनें नेमलेल्या प्लास्टिक पॅनेलचे ते चेअरमन आहेत. गतवर्षी भारतीय कारखानदारांचें परदेशांत जें औद्योगिक शिष्टमंडळ श्री. घनःशामदास बिर्ला यांच्या नेतृत्वाखाली गेलें होतें त्याचे ते एक सभासद होते.

देशी व विदेशी खेळांची त्यांना आवड असून अनेक क्लबांचे ते संस्थापक-सभासद आहेत. स्वतःच्या कर्तबगारीवर व आपल्या अंगच्या गुणांवर त्यांनीं धंद्यांत यश मिळविलें असून आज भारतांतील प्रथम श्रेणीच्या कारखानदारांत त्यांची गणना होते. मुंबई सरकारनें त्यांची शेरीफ म्हणून नेमणूक करून त्यांचा गुणगौरव केला आहे व नवीन कार्यक्षेत्रांत कार्य करण्याची संधि दिली आहे.

---

**गेल्या हंगामांतील साखरेचें उत्पादन**—१९५७-५८ सालच्या हंगामांत देशांतील साखरेच्या कारखान्यांनीं १९,७६,००० टन साखर निर्माण केली. १९५६-५७ सालच्या हंगामांत सुमारें २०,२६,००० टन साखर तयार करण्यांत आली होती. भारताला १ लाख टन साखर निर्यात करण्याची परवानगी मिळालेली आहे.

**अन्नधान्याचा सरकारी व्यापार**—मध्यवर्ती सरकारचे शेतकीमंत्री श्री. पंजाबराव देशमुख उज्जैन येथें व्यापाऱ्यांच्या सभेंत बोलतांना म्हणाले कीं, देशांतील चलनवृद्धि आणि अन्न धान्याच्या चढत्या किंमती लक्षांत घेता धान्याचा व्यापार सरकारनें आपल्याकडे घेणें अपरिहार्य झालें आहे. तथापि त्यामुळें सर्वच धान्यव्यापारी धंद्यांतून हुसकले जातील, असें मात्र नाहीं.

## मल्टिपर्पज सोसायट्यांवर वाढता भर

### प्रोसेसिंगचें व मार्केटिंगचें स्थान

सहकारी खात्यांच्या रजिस्ट्रारांची बैठक दिल्ली येथें नुकतीच भरली होती. त्या बैठकींत, सहकारी सोसायटीच्या यशस्वी कारभाराला तीन खेड्यांपर्यंत मर्यादा वाढविणें आवश्यक आहे, असें ठरलें. ह्या सोसायट्या मर्यादित जबाबदारीच्या असाव्यात, परंतु मद्राससारख्या ज्या राज्यांतून अमर्याद जबाबदारीच्या तत्त्वाची अंमलबजावणी यशस्वी रीतीनें झाली आहे, तेथें अमर्याद जबाबदारी चालू रहाण्यास हरकत नसावी. सोसायट्यांच्या कार्यक्षेत्रांतील वाढ लक्षांत घेतां, तकावी कर्जें किंवा इतर स्वरुपाची सरकारी मदत सहकारी संघटनेमार्फतच दिली जावी. अल्पबचत योजनेच्या द्वारांहि सहकारी सोसायट्यांना पुष्टी मिळावी. नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलच्या निर्णयांवरील रजिस्ट्रारांच्या विचारविनिमयास, त्या त्या राज्यांमधील खात्यांतील अधिकाऱ्यांशीं व मुख्य मंत्र्यांशीं चर्चा करून व्यावहारिक स्वरूप प्राप्त होईल, आणि त्यांतून १९५९-६० बाबत योजनांचा तपशील कायम करण्यांत येईल.

सोसायटीच्या आकाराबाबत रजिस्ट्रारांच्या बैठकींत बरीच चर्चा झाली. उत्तर प्रदेश प्रभृति राज्यांत सोसायट्यांचा आकार फार वाढत चालला होता, तर नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलचा निर्णय दुसऱ्या टोकास गेला होता. १,००० सभासदांची मर्यादा जरा लवचीक ठेवली जावी, असें साधारण मत दिसलें. एकाच मल्टिपर्पज सोसायटीनें कर्जे, खतें, बी-बियाणें, आयुधें, ह्यांचा पुरवठा आणि माल विक्रीलायक करणें व प्रत्यक्ष मालविक्री करणें, हीं सर्व कामें करावीं, असा चर्चेचा सूर आहे. प्रोसेसिंग व मार्केटिंग ह्या कामांस विशेष महत्त्व ह्यापुढें येणार आहे, कारण अन्नधान्याचा घाऊक व्यापार पुढेंमागें सरकारी नियंत्रणाखाली जाण्याचा संभव आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत १,९०० मार्केटिंग सोसायट्यांची तरतूद आहे, त्यांपैकीं १,००० सोसायट्या चालू वर्षअखेर अस्तित्वांत आलेल्या असतील. नव्या सहकारी कार्यक्रमाला मध्यवर्ती सरकारनें द्यावयाच्या आर्थिक मदतीचा प्रश्न, मध्यवर्ती व राज्य सरकारांनीं तपशिलाची चर्चा केल्यानंतर, विचारांत घेतला जाईल.

---

**खताचे नवे कारखाने**—खताचे खाजगी मालकीचे कारखाने काढण्यासाठी भांडवलदारांकडून अर्जे आल्यास सरकार त्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार करील, असें जाहीर करण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें अनेक भांडवलदारांकडून तसे कारखाने काढण्यासाठी अर्जे आले आहेत, अशी माहिती लोकसभेंत उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं सांगितली.

**चहाच्या मळ्यांना मदत**—चहाच्या मळ्यांना आर्थिक मदत देण्याचा मध्यवर्ती सरकार विचार करीत असून ह्याविषयीं रिझर्व्ह बँकेशीं विचारविनिमय करण्यांत येत आहे. चहाच्या निर्यातींत भारताला चहा पिकविणाऱ्या इतर देशांकडून अधिक स्पर्धा होत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंतील भारताचें स्थान टिकविण्यासाठी अशा मदतीचा चांगला उपयोग होईल.

**विमा कामगारांचा बोनस**—आयुर्विमा व्यवसायाचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आल्यावर विमा कॉर्पोरेशनच्या नोकरांना बोनस देण्याची पद्धत बंद करण्यांत आली आहे. कारण, विमा व्यवसायाचा हेतु आतां नफा मिळविणें हा राहिला नसून लोकांची सेवा करणें हा आहे असें लोकसभेंत सरकारतर्फे सांगण्यांत आलें.

## साखरेचा नवा आंतरराष्ट्रीय करार

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या साखर परिषदेची बैठक जिनीव्हा येथें भरली होती. साखरेच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधीं झालेल्या तेथील चर्चेत ५० देशांच्या प्रतिनिधींनीं भाग घेतला होता. परिषदेनें ४८ कलमें असलेला एक नवा आंतरराष्ट्रीय करार एकमतानें मंजूर केला आहे. हा करार पुढील पांच वर्षे अंमलांत राहणार आहे. ह्या पूर्वीच्या करारांत भारत, ब्राझिल व पेरू हे देश सहभागी नव्हते. नव्या करारांत मात्र ते सामील झाले आहेत. जुन्या कराराची मुदत डिसेंबर १९५८ अखेर संपत आहे. कराराप्रमाणें भारताला १,००,००० टन साखर निर्यात करण्याची परवानगी मिळाली आहे. भारतामधील साखर निर्यात करून परदेशी चलन मिळतें. परिषद २२ सप्टेंबरपासून २४ ऑक्टोबरपर्यंत चालली होती.

## रशिआंत मद्यपानावर कडक निर्बंध

रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चाव्ह ह्यांनीं मद्यपानावर कडक निर्बंध घालण्याचें ठरविलें आहे. रशिअन लोक मद्यासक्त होत असून त्यामुळें सार्वजनिक आरोग्य बिघडत आहे आणि औद्योगिक उत्पादन घटत आहे, अशी तक्रार तेथील वृत्तपत्रांतून गेले कित्येक महिने करण्यांत येत होती. ह्यापुढें रशिआंतील मद्यप्यांना रेस्टॅारंटमधून एकावेळीं एकच ग्लास दारू देण्यांत येईल. मद्यपानाला आळा बसावा म्हणून कांहीं दिवसांपूर्वी दारूच्या किंमती १० ते २० टक्क्यांनीं वाढविण्यांत आल्या होत्या. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. १९१७ सालीं क्रांति झाल्यावर रशिआनें दारूबंदीचा प्रयोग केला होता. पण अमेरिकेप्रमाणेंच रशिआंतील प्रयोगहि फसला.

## "ध्रुव" शं. वा. कि. अंक

'ध्रुव' साप्ताहिकानें दि. २१-११-१९५८ चा अंक शं. वा. कि. अंक म्हणून प्रसिद्ध केला आहे. प्रारंभींच्या लेखांत श्री. शंकररावांच्या कार्याचा परिचय दिला असून, 'किर्लोस्करवाडीची महापर्वणी' ह्या श्री. त्रं. रा. अभंग ह्यांच्या सहीनें छापलेल्या लेखांत दि. ३ नोव्हेंबरच्या सत्कार समारंभाचें रसभरित वर्णन करण्यांत आलेलें आहे, तें चटकदार झालें आहे. श्री. अभंग ह्यांच्यांतील कवीनें तें गद्यांत लिहिलें आहे, एवढेंच.

**मिठाचे सांठे सांचूं लागले**—उत्तर गुजरातमधील मिठागरांतून निर्माण करण्यांत येणाऱ्या मिठाचे सांठे सांचूं लागले आहेत. खाराघोडा येथील मिठागरांतून ४० लाख मण मीठ पडून आहे. सांठे सांचल्यामुळें सरकारी मिठागरांतून तयार होणाऱ्या मिठाच्या किंमती उतरण्याचा संभव आहे.

**ब्रिटनच्या मालावर बहिष्कार**—ब्रिटनमधील कांहीं कारखानदार बरांच माल वेस्ट इंडीजला निर्यात करतात. परंतु आपल्या कारखान्यांतून निग्रोंना कामावर मात्र घेत नाहींत. हे धोरण असेंच चालू राहिल्यास ब्रिटनच्या मालावर वेस्ट इंडीजचें सरकार बहिष्कार टाकण्याचा संभव आहे.

**ट्रॉम्बे अणुकेंद्रासाठी ब्रिटिश तज्ज्ञ**—ट्रॉम्बे येथील अणुकेंद्रासाठी एका ब्रिटिश शास्त्रज्ञाची नेमणूक करण्यांत आली आहे. कोलंबो मदत योजनेप्रमाणें देण्यांत येणाऱ्या तांत्रिक सहकार्याच्या कार्यक्रमास अनुसरून तो दोन वर्षे काम करील. ह्या काळांत त्याच्याकडून हिंदी शास्त्रीय कामगारांना शिक्षणहि देण्यांत येणार आहे.

## संप झाला तर उत्पन्नाची वाटणी

अमेरिकेंतील सहा सर्वांत मोठ्या विमान वहातूक कंपन्यांनीं असा करार केला आहे कीं, त्यांच्यापैकीं कोणत्याहि एका अगर अधिक कंपनींत संप झाला तर इतर कंपन्यांनीं आपलें उत्पन्न वांटून द्यावयाचें. ह्या सहा कंपन्यांपैकीं एकांत यंत्रज्ञांचा संप चालू असून आणखी एका कंपनीच्या कामगारांनीं संपाची धमकी दिली आहे. अमेरिकेंतील इतर विमानवहातूक कंपन्यांनाहि ह्या करारांत भाग घेण्याची विनंती करण्यांत आली आहे. ह्या करारामुळें लोकांची सोय होईल आणि कंपन्यांची कामगारांशीं वाटाघाटी करण्याची ताकद वाढेल असा विश्वास व्यक्त करण्यांत येत आहे. एखादी कंपनी बंद झाल्यामुळें इतर कंपन्यांना जी जादा वहातूक मिळेल, तिचा खर्च वजा जातां बाकीची रक्कम संप झालेल्या कंपनीला मिळेल.

## छोट्या शोधांना उत्तेजन

भारतामधील छोट्या उद्योगधंद्यांना उपयोगी पडतील अशा प्रकारचे शोध लावणारास उत्तेजन देण्यासाठी भारत सरकार एक बोर्ड निर्माण करणार आहे. देशांतील कामगारांच्या संशोधक वृत्तीस वाव मिळावा अशी सरकारची इच्छा आहे. ह्या हेतूनें अशा प्रकारच्या शोधासाठी दरसाल १,००० रुपयांपासून २५,००० रुपयांपर्यंचीं बक्षिसें ठेवण्यांत येणार आहेत. कांहीं शोध तात्कालिक दृष्टीनें यशस्वी ठरले नाहींत तरीसुद्धां त्यांच्या शोधकांना मदत करण्यास सरकार मागेंपुढें पहाणार नाहीं. ह्या कामासाठी चालू संशोधन शाळांचा व संस्थांचा उपयोग करून घेण्यांत येईल.

## चीनच्या वाढत्या उत्पादनाचा प्रभाव

चीनच्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या चालू वर्षांत शेतकीच्या व कारखानदारीच्या उत्पादनांत विलक्षण वाढ झाल्याच्या वार्ता आहेत. विशेषतः अन्नधान्य, कापूस, कोळसा व पोलाद ह्यांचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढलें आहे. चीननें उत्पादनवाढीची ही किमया कशी करून दाखविली, त्याचा अभ्यास करण्यासाठी भारतामधील तज्ज्ञांचें एक मंडळ चीनला पाठविण्याचें घाटत आहे. चीनच्या सरकारनें अधिकृतरीत्या जाहीर केलेले आंकडे संपूर्णतया विश्वसनीय मानले, तरीसुद्धां उत्पादनाची वाढ आश्चर्यकारक मानण्यांत येत आहे. पाश्चिमात्य देशांतील एका अर्थशास्त्रज्ञानें असे उद्गार काढले आहेत कीं, १९५७ सालची सर्वांत महत्त्वाची घटना रशिआचा उपग्रह मानली तर चीनचें १९५८ सालचें पीक ही त्या सालांतील सर्वांत महत्त्वाची घटना मानावी लागेल.

## हिंदी रेल्वेजवरील ३० सहकारी पतपेढ्यांचे ५ लक्ष सभासद

नोकरवर्गाच्या फायद्यासाठी सहकारी संस्था स्थापन करण्यांत पुढाकार घेतलेल्यांत भारतीय रेल्वेंचाहि समावेश होतो. रेल्वेवरील पहिली सहकारी पतपेढी मद्रास येथें इ. स. १९०७ मध्यें स्थापन झाली. सध्यां रेल्वेच्या ३० सहकारी पतपेढ्या असून त्यांची सदस्यसंख्या एकूण रेल्वे नोकरवर्गाच्या जवळजवळ निम्मी म्हणजे ५ लाख आहे. रेल्वेवर पहिली ग्राहक सहकारी संस्था १९१८ मध्यें कांचरपारा येथें स्थापन झाली. या वर्षाच्या जून अखेरीस भारतीय रेल्वेवर अशा एकूण १२१ संस्था असून, त्यांची सदस्यसंख्या ५०,००० आहे.

## पूना बँकर्स क्रिकेट ट्रॉफीचा बक्षीस समारंभ

पूना बँकर्स असोसिएशनतर्फे भरविण्यांत आलेल्या क्रिकेट सामन्यांत यशस्वी झालेल्या संघांस व प्रावीण्य दाखविलेल्या खेळाडूंना बक्षिसें वांटण्याचा समारंभ दि. २८ नोव्हेंबर रोजीं संध्याकाळीं ६–३० वाजतां पुणें सें. को. बँकेच्या सभागृहांत युनायटेड कमर्शिअल बँकेचे जनरल मॅनेजर, श्री. एस. टी. सदाशिवन् ह्यांच्या हस्तें झाला. गेल्या वर्षीची पूना बँकर्स ट्रॉफी (श्री. बी. बी. पुरोहित ह्यांनीं ठेवलेली) युनायटेड कमर्शिअल बँकेनें जिंकली. स्टेट बँकेचा अनुक्रम तिच्या खालोखाल लागला. बक्षीस समारंभाचे वेळीं ट्रॉफी कमिटीचे सेक्रेटरी श्री. एस. बी. वर्तक ह्यांनीं प्रास्ताविक भाषण केल्यावर व श्री. पुरोहित ह्यांचा यशचिंतनपर विद्युत् संदेश वाचून दाखविल्यावर दुसरे चिटणीस श्री. डब्ल्यू. जी. आळतेकर ह्यांनीं सामन्यांचा वृत्तांत निवेदन केला. बक्षिसें वांटून झाल्यावर, श्री. सदाशिवन् ह्यांनीं यशस्वी संघांचें व प्रावीण्य दाखविणाऱ्या खेळाडूंचें अभिनंदन केलें. बँकिंगच्या व्यवसायांतील लोकांना क्रिकेटसारख्या श्रमपरिहारक खेळांचें व करमणुकीचें किती महत्त्व आहे, ह्याचें त्यांनीं वर्णन केलें. श्री. नी. ना. क्षीरसागर ह्यांनीं त्यांना पुष्पहार अर्पण केल्यावर श्री. चिटणीस ह्यांनीं आभारदर्शन केलें व चहापानानंतर समारंभ समाप्त झाला.

### श्री. सदाशिवन् ह्यांना मेजवानी

रात्रीं ८–३० वाजतां पूना बँकर्स असोसिएशननें श्री. सदाशिवन् ह्यांच्या गौरवार्थ एक थाटाची मेजवानी दिली. त्यावेळीं रिझर्व्ह बँकेच्या पश्चिम विभागाच्या स्थानिक बोर्डाचे सदस्य श्री. दा. वा. पोतदार, सध्यां पुणें येथें रजेवर असलेले रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी इकॉनॉमिक ॲडव्हायसर श्री. डी. एस. सावकार, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे श्री. व्ही. आर. सोनाळकर, "अर्थ"चे संपादक श्री. श्री. वा. काळे व असोसिएशनचे सभासद बहुसंख्येनें उपस्थित होते.

### दि बेलापूर कं. लि.

वरील कंपनीनें ३०–९–१९५८ अखेर संपलेल्या वर्षी २,०३,३९,१३५ रु. ची साखरविक्री केली. इतर उत्पन्न मिळवलें असतां, एकूण जमा २,०७,६९,४६१ रु. ची झाली. कंपनीनें सरकारला एक्साइज ड्यूटी व शुगरकेन सेस मिळून ६९,१३.०१८ रु. दिले. करासाठी १७,२५,००० रु. ची तरतूद केली. मॅनेजिंग एजंटांना ५,४०,२९२ रु. कमिशन दिलें. रिझर्व्ह फंडांत ११,८०,९१७ रु. टाकले. डिव्हिडंडसाठी (५० रु. च्या प्रत्येक शेअरवर १८ रु. डिव्हिडंड व २ रु. बोनस) २८,१९,८६० रु. लागणार आहेत. कंपनीनें सरकारी व इतर रोख्यांत २४ लक्ष रु. गुंतवले आहेत आणि बँकांत मुदती व चालू ठेवींत ८५ लक्ष रु. आहेत.

### बॉंबे स्टेट को. लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेनें १९५७–५८ मध्यें ३० लक्ष रुपयांची २१४६ नवीं कर्जें दिलीं; १९५६–५७ मध्यें १६ लक्ष रुपयांचीं ९७२ कर्जें देण्यांत आलीं होतीं.

कर्जदारांकडून येणें झालेलें मुद्दल कर्ज १७ लक्ष, ४० हजार रु. होतें, त्यांपैकीं ६ लक्ष, ५५ हजार रु. मुद्दल वसूल झालें. येणें व्याज ६ लक्ष, ३ हजार रु. पैकीं ५ लक्ष ३१ हजार रु. व्याज वसूल झालें. म्हणजे, मुद्दलाची वसुली ३७·६% व व्याजाची वसुली ८८% झाली. १९५६–५७ चें तत्सम प्रमाण अनुक्रमें ४१·६% व ९०% होतें.

बँकेचें एकूण येणें कर्ज १,३३,३०,७६० रु. आहे.

### सरकारी अधिकारीच स्वतःविषयीं खोटी माहिती पुरवितात !

"सेंट्रल सिव्हिल सर्व्हिसेस कॉंडक्ट रूल्स" अन्वयें मध्यवर्ती सरकारच्या पहिल्या व दुसऱ्या श्रेणीच्या अधिकाऱ्यांना दरसाल आपल्या स्थावर मिळकतीविषयीं सरकारला माहिती द्यावी लागते. सुमारें ३१,००० अधिकारी अशीं माहितीपत्रकें भरून देतात. मार्च, १९५५ मध्यें ह्यासंबधीं नियम अंमलांत आले, तेव्हांपासून आतांपर्यंत त्यांपैकीं १३७ माहितीपत्रकें सरकारनें तपासून पाहिलीं. तेव्हां त्यांपैकीं बहुतेकांतील माहिती चुकीची किंवा अपुरी होती, असें आढळून आलें. १०६ प्रकरणांत शिस्तीचे उपाय योजण्यांत आले. ५ प्रकरणांत लबाडीचा उद्देश नव्हता, असें दिसून आलें आणि २६ प्रकरणांची छाननी अद्याप चालू आहे.

### रेल्वे स्टॉल्ससाठी सहकारी सोसायट्या

"प्रत्येक रेल्वेवर, एकदोन स्टेशनांत, चहा–फराळाचीं दुकानें सहकारी सोसायट्यांकडे सोंपवावीं; ह्या सोसायट्यांत मुख्यतः प्रत्यक्ष कामगारांचा भरणा असावा" अशी रेल्वे बोर्डानें सूचना दिल्या आहेत. सध्यां सदर्न रेल्वेवर ह्या प्रकारच्या २०, नॉर्दर्न रेल्वेवर दोन आणि नॉर्थ-ईस्टर्न रेल्वेवर एक सोसायट्या चालू आहेत.

### मोहकतेच्या शिक्षणाची शाळा

वाय. डब्ल्यू. सी. ए च्या तर्फे कलकत्ता येथें एक "चार्म स्कूल" काढण्यांत आलें आहे. 'कचेरींतील मोहकपणा', "तुमचें रोजचें सौंदर्य", "आकर्षकतेस उठाव देणारी केशरचना" इत्यादि विषयांवर व्याख्यानमाला गुंफण्यांत येतील आणि अभ्यासक्रम समाधानकारक पुरा करणाऱ्यांना प्रशस्तिपत्रकें देण्यांत येतील.

### रेडिओ लँप वर्क्स लि.

वरील कंपनीनें ३१ मार्च, १९५८ अखेर संपलेल्या वर्षी १ कोटी, १२ लक्ष रुपये किंमतीचे विजेचे दिवे तयार केले. त्यापूर्वीच्या वर्षी ८६ लक्ष रुपये किंमतीचें उत्पादन झालें होतें. ऑर्डिनरी भागांवरील डिव्हिडंड ७½% चें ९% करण्यांत आलें आहे.

### सिमल्या बटाट्याची किंमत उतरणार ?

हिमाचल प्रदेशांतील बटाट्याच्या लागवडींत ह्यापुढें वाढ होऊं न देण्याचा तेथील सरकारचा बेत आहे. सिमला बटाट्याचें वेणें येत्या कांहीं वर्षांत स्वस्त होण्याचा रंग दिसतो; ती किंमत घसरूं न देण्याचा हिमाचल प्रदेश सरकारचा प्रयत्न राहील.

### संपत्ति कराची वसुली

१९५८–५९ च्या सप्टेंबरअखेरच्या मुदतींत संपत्ति करानें सरकारला १,३०,९३,००० रु. दिले.

**कॉंग्रेस अधिवेशनाची तयारी**—कॉंग्रेसचें ६४ वें अधिवेशन नागपूर येथें ६ ते ११ जानेवारी १९५९ पर्यंत भरणार आहे. अधिवेशनासाठी उभारण्यांत येणाऱ्या शंकरनगराचा पसारा ३०० एकर जागेवर पसरला आहे. प्रतिनिधींसाठी २० छावण्या बांधण्यांत येत असून खादी व ग्रामोद्योग प्रदर्शनासाठी ५०० गाळे बांधण्यांत येत आहेत. सर्व कामांसाठी बांबूंचा उपयोग करण्यांत येत आहे.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | $2\frac{1}{2}$ टक्के |
| २ वर्षें | $2\frac{3}{4}$ टक्के |
| ३ वर्षें | ३ टक्के |
| ५ वर्षें | $3\frac{1}{2}$ टक्के |
| १० वर्षें | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१–७–५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) — श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्हं | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ७०,००,०००चे वर |

बँकेचे इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

स्थापना सन १९३५ — टे. नं. २६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९५,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री रा. सा. भ. ना. ढोबळे, ( अध्यक्ष )
श्री. गे. गो. ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, (ऑ. मॅ. डायरेक्टर)
श्री. म. बा. बेंडे, ( ऑ. खजिनदार )
श्री. म. मा. वामन डायरेक्टर
श्री. गे. ल. पाटील नलवडे ,,
श्री. आ. पां. ढोरे ,,
श्री. ज्ञा. मा. मनसुख ,,
श्री. म. रा. नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.